# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
स्थापना १९८१





कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ८ वे** | **ऑक्टोबर - डिसेंबर २०१३** | **अंक ३ रा**

**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर**
**मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर**
**मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**
**मो.नं ९४४९०५१६५३**



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ०९८५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
०९९७०१७४८१८

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०९८१९२५१८९५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव : ०९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली : ०९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ०९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०८८८८२२१७४६
श्री. यशवंत पंडीत, सातारा : ०९८५०३११४२४
श्री. सुनील जठार, राजापूर : ०९२७०५७९४००
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ०९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली : ०९८२२९९५८९२
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ०९२२७१३५७९४


**इतर संघांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**

**कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते.**


**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक-हेमकिरण शंकर बाक्रे**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५१०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी,संघाच्या कार्यालयात, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**- श्री. हेमकिरण बाक्रे**


**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


४ या 'दहशतवाद्यांना' वेळीच आवरा

५ झांशीवाली

७ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे वार्षिक सर्वसाधारण सभा - २०१३ वृत्तांत

९ मानसी मोघे - मिस इंडीया दिवा २०१३

११ यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?

१३ विविधज्ञ कऱ्हाडे

१७ दिनांक २१/०७/२०१३ च्या डोंबिवली येथील सभेचा इतिवृत्तांत

२० संस्था वृत्त

२३ केल्याने परदेशाटन

२५ 'संपर्क'चा इतिहास

२७ माझी काश्मीर यात्रा व तेथील अविस्मरणीय आठवणी


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**- संपादक**

संपर्क



# संपादकीय

आज भोवताली काय चाललंय् हेच समजेनासे झाले आहे. रोज नवीन बातम्या, पण त्या पचनी पडण्यासारख्या नाहीत राजकारणी तर पूर्ण गुन्हेगारांच्या आहारी गेल्या सारखे दिसतात. कुणालाही सामान्य जनतेची काळजीच राहिलेली नाही. वानगीदाखल काही उदाहरणे पाहू.

श्री. जगनमोहन रेड्डी वायएस्आर कॉंग्रेसचे अध्यक्ष जे ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त संपत्ती असल्याबद्दलच्या खटल्यांत अटकेत होते. त्यांची १६ महिन्यानंतर जामिनावर सुटका.

सर्वोच्च न्यायालयाने ज्या लोकसभा उमेदवाराला दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झाली असेल, अथवा यापुढे होईल त्या उमेदवाराचे सभासदत्व आपोआप रद्द होईल, असा निर्णय दिला. सदर निर्णय सर्व प्रकारच्या उमेदवारांना ग्राम-पंचायत, नगरसेवक, आमदार, खासदार लागू होईल असेही स्पष्ट केले. त्यावर केंद्र सरकारने खंडपीठाकडे अपिल केले. तेही फेटाळले गेल्यावर, कायदाच बदलला व सर्व गुन्हेगार उमेदवारांना संरक्षण दिले.

महाराष्ट्र विधानसभेने सर्व आमदारांचे निवृत्तीवेतन रु.२५,०००/- वरून दरमहा रु.४०,०००/- केले. आमदारांना निवृत्ती वेतनाची आवश्यकता आहे का? (अर्थात काही हाताच्या बोटावर मोजण्याइतके अपवाद वगळता) आजकाल आपण आपल्या प्रभागाचा नगरसेवकही त्याच्या पहिल्या टर्म मध्ये किती श्रीमंत (?) होतो हे पाहतोच, मग आमदार, खासदारांची काय श्रीमंती असेल बरं?

जम्मू-काश्मिर सरकार उलथवण्याचा कट व त्यात भारतीय लष्कराच्या निवृत्त जनरलचा हात?

मुझफ्फरपूर जातीय (माफ करा, दोन गटांत झालेल्या) दंगलीत ४८ लोक ठार होऊनसुद्धा, त्यातील राजकारण मात्र थांबत नाही. हा समाजवादी पक्ष व भारतीय जनता पक्ष यांनी २०१४ च्या निवडणुकीसाठी तयार केलेली पार्श्वभूमी आहे, असाही आरोप केला जातोय.

किती म्हणून बातम्या सांगाव्यात? डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे मारेकरी सापडत नाहीत. पुण्यातील इतरही काही गुन्ह्यांमध्ये महिनोंमहिने तपास चालू असूनसुद्धा, मारेकरी सापडत नाहीत. गुन्हा सीबीआयकडे वर्ग करावा, अशीही बऱ्याचवेळा मागणी केली जाते. पण सीबीआयवर विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती आहे कां? नुकतीच, सीबीआयने श्री. सुशिलकुमार शिंदेना आशिर्वाद प्रकरणांत क्लिन चीट दिली नाही कां?

खरेच, आज काल कळेनासेच झाले आहे. कुणावर विश्वास ठेवावा ते? सर्वत्र परिस्थिती अशी आहे की, कोणतेच काम वेळेवर, नियमात व लाच न घेऊन होत नाही. सामान्य नागरिक पुरता भांबावून गेलाय व कुठल्याच पक्षाच्या सरकारला ना याची खंत ना खेद.

लहानपणापासून असे शिकविण्यांत आले की, दुष्ट प्रवृत्तींचा जेंव्हा अतिरेक होतो, तेंव्हा म्हणे देव अवतार घेतो, पण अजून तरी देवाने अवतार घेतल्याचे ऐकिवात नाही कां देव, कृष्णाने शिशुपालाचे १०० अपराध पूर्ण झाल्याशिवाय शासन करायचे नाही असे ठरविले होते, तसे १०० अपराध अजून पूर्ण झाले नाहीत म्हणून वाट पहात असेल? कदाचित असेही असेल की, आता सर्व प्रकारची मर्यादा वाढत असल्यामुळे देवाने अपराधाचा आकडा १०० वरून १००० केला असेल. मला असेही वाटते की, माणसाच्या अघोरी कृत्यांपुढे देवाने शरणागती पत्करली असेल. आज सर्व देशाला भावणारा, सामान्य जनतेला समजावून घेणारा तिच्या दु:खावर वेळप्रसंगी फुंकर मारणारा, तिला खरोखरीचा दिलासा देणारा, तिची व्यथा जाणणारा व त्यावर योग्य तो उपाय करणारा, त्यासाठी वाटेल ते करणारा नेता भारतवर्षात आहे काहो? दिसत तर नाही, पण दृष्टिपथांत नजिकच्या काळांत येईल कां हो कोणी?

आपण सामान्य लोक अपेक्षा करण्यापलिकडे काय करू शकतो? आपल्या हातात राहिले तरी काय?

पण सध्यातरी अराजक सदृश्य परिस्थितीला सामोरे जाण्यावाचून व आपापल्यापरीने त्या परिस्थितीला भिडण्यावाचून कांही पर्याय आहे असे वाटत नाही.

वाचकहो, येणाऱ्या भीषण परिस्थितीला समर्थपणे तोंड देण्याची ताकद आपल्यांत येवो, हिच सदिच्छा याप्रसंगी व्यक्त करतो.

धन्यवाद!

# या ‘दहशतवाद्यांना’ वेळीच आवरा

**सौ. अनुराधा श्रीपाद जोशी ९९२०४६६५०९**

मुलांचा अभ्यास हा तर एक स्वतंत्रच विषय होईल. काही घरामध्ये पालकांना साध्या बातम्या ऐकायच्या असतील तरी देखील मुलांच्या हातून रिमोट मिळवण्यासाठी त्यांना आर्जव करावी लागतात इतकी या मुलांची टी.व्ही वर देखील मालकी प्रस्थापित झालेली असते. अर्थात सर्वच घरातून इतकी वाईट परिस्थिती नसली तरी अशा घरांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे हे निश्चित.यावर आपण सर्वांनीच गांभीर्याने विचार करायची वेळ आली आहे. कारण हीच पिढी उद्या तरूण होऊन, समाजात वावरणार आहे. तरूण पिढी सशक्त समाजशील असेल तरच कोणत्याही देशाची प्रगती होते.

संध्याकाळची कातरवेळ झालेली. सहजच मुलाचा रडण्याचा आवाज आला म्हणून खिडकीतून खाली पाहिले समोरच्या इमारतीच्या पार्किंगमध्ये साधारण ४ ते ५ वर्षांचा मुलगा रडत होता. रडत होता म्हणण्यापेक्षा आक्रस्ताळेपणा करीत होता. बरोबर बहुधा वडील असावेत. आपलं म्हणणं पटविण्यासाठी तो अक्षरश: त्यांना नाचवित होता. तो एवढासा मुलगा आरडाओरडा करीत कधी वडिलांना हातातल्या चेंडूने मारीत होता तर, कधी बॅटने त्याचे वार चुकविण्यासाठी वडील अक्षरश: इकडून तिकडे नाचत होते. असे बराच वेळ चालले होते. मुलाचा आरडाओरडा आक्रस्ताळीपणा काही थांबत नव्हता. वडील अगदी मेटाकुटीला आले होते. त्यांना बहुधा महत्वाच्या कामासाठी बाहेर जायचे होते व मुलाला मात्र टी.व्ही. पहायचा असल्यामुळे त्याला त्यांच्याबरोबर जायचे नव्हते. म्हणून तो त्यांना गाडीपर्यंत जाऊच देत नव्हता. गाडीवर देखील बॅटने प्रहार करणे चाललेच होते. हे सर्व असह्य होऊन मीच खिडकीतून बाजूला झाले. मनात मात्र विचारांनी थैमान घालायला सुरूवात केली.

आजकाल थोड्याफार फरकाने सर्वत्र घराघरातून हेच चित्र दिसत आहे. सर्व घर एका मुलाच्या भोवती भोवऱ्यासारखे फिरते आहे. तो किंवा ती काय म्हणेल त्याप्रमाणे त्यांची इच्छापूर्ती करण्यासाठी घरातील सर्व सदस्य (अगदी कामवाली मावशीदेखील) सदैव तयार असतात. तरी देखील या मुलांचे समाधान नसते सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत फक्त त्यांचे म्हणणे ऐकणे, त्यांच्या तालावर नाचणे, त्यांच्या आवडीनिवडी सांभाळणे या व्यतिरिक्त आजच्या आई–बाबांना दुसरे कामच राहिले नसल्यासारखी सध्याची परिस्थिती कमीअधिक प्रमाणात सर्वत्र दिसते. आई–वडिल दोघंही नोकरी करणारी असतील; तर परिस्थिती अधिकच बिकट असते. सकाळी घरातून बाहेर पडेपर्यंत मुलाची किंवा मुलीची समजूत काढून त्यांना शाळेत पाठवणे हे बरेचवेळा अनेकांना जिकीरीचे होते आहे, असे आपल्या अवतीभोवती पाहिल्यास जाणवते. आईवडीलही आपण दिवसभर नोकरीनिमित्त बाहेर असतो, त्यामुळे मुलांना वेळ देऊ शकत नाही असा स्वत:बद्दल न्यूनगंड बाळगून असतात. त्यामुळे ते मुलांनी मागितलेली प्रत्येक गोष्ट बिनातक्रार त्वरीत मुलांना घेऊन देतात. हळूहळू ही मुले आईवडीलांची बाजू बरोबर ओळखतात व काही वेळा आपल्या अवास्तव मागण्यादेखील सहज पुरवून घेतात. इथूनच पुढे हळूहळू मुले पालकांना आपल्या तालावर नाचवायला लागतात. ‘नाही’किंवा ’नको’ हा शब्द देखील त्यांना सहन होत नाही. अगदी शुल्लक गोष्टींवरून देखील ही मुले आक्रस्ताळीपणा करतात. दिवसभराच्या तणावपूर्ण व धावपळीच्या रूटीनमुळे आईवडील देखील पूर्णपणे थकून गेलेले असतात. त्यामुळे मुलांना समजावण्याचे किंवा शिस्त लावण्याचे त्राणच त्यांच्यात राहिलेले नसतात. त्यामुळे अगदी नाईलजास्तव मुलाच्या अवाजवी व अवास्तव मागण्या पुऱ्या करण्याखेरीज त्यांच्याजवळ दुसरा पर्यायच नसतो. त्यामुळे रेल्वे–बसचा मनस्ताप देणारा प्रवास करून आलेले डोक्यात तऱ्हेतऱ्हेचे ताण बाळगणारे पालक काही वेळा अगदी हतबल होतात. त्यांना समजत असतं पण नाईलाज असतो. आणि एखाद दिवशी पालकांनी ठरवून मुलाच्या मागण्या मान्य न करता त्याला समजावण्याचा प्रयत्न केलाच, तर ते मुल घर अक्षरश: डोक्यावर घेते. पालकांचा नाईलाज होतो. या मुलांच्या हट्टाची पालकांच्या मनात दहशत निर्माण होते. घरी गेल्यावर मुलांचा मूड कसा असेल याचे टेंशन पालकांना ऑफिसमध्येही दिवसभर छळत असते.

मुलांचा अभ्यास हा तर एक स्वतंत्रच विषय होईल. काही घरामध्ये पालकांना साध्या बातम्या ऐकायच्या असतील तरी देखील मुलांच्या हातून रिमोट मिळवण्यासाठी त्यांना आर्जव करावी लागतात.इतकी या मुलांची टी.व्ही वर देखील मालकी प्रस्थापित झालेली असते. अर्थात सर्वच घरातून इतकी वाईट परिस्थिती नसली तरी अशा घरांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे हे निश्चित.

यावर आपण सर्वांनीच गांभीर्याने विचार करायची वेळ आली आहे. कारण हीच पिढी

उद्या तरूण होऊन, समाजात वावरणार आहे. तरूण पिढी सशक्त समाजशील असेल तरच कोणत्याही देशाची प्रगती होते. म्हणून आत्तापासूनच या मुलांना संस्कारक्षम, परोपकारी वृत्ती अंगी भिनवणे, आजूबाजूचे भान कसे राखावे या विषयी त्यांना समजावणे या सर्व गोष्टी आता या मुलांच्या परिवारातील लोकांनी व शेजारपाजारच्या वृद्धांनी अगदी आपली सामाजिक जबाबदारी समजून केल्या पाहिजेत. शक्य असेल तेथे दोन्हीकडच्या आजी–आजोबांनी काही मतभेद असतील, तर ते विसरून या मुलांच्या कल्याणासाठी एकत्र आले पाहिजे. परिवारातील सर्व सदस्यांनी सतत एकमेकांकडे जाणे–येणे ठेवले पाहिजे त्यातूनच या मुलांना भावनिक आधार मिळेल व त्यांचा आक्रस्ताळेपणा आपोआप कमी होत जाईल. पालकांनीसुध्दा शनिवार–रविवारी मुलांना मॉलमध्ये फिरवण्यापेक्षा एखाद्या नातेवाईककाकडे किंवा मित्राकडे घेऊन गेल्यास मुलांना नातेसंबंधांची गोडी लागेल बरोबरच्या मुलांमध्ये संवाद झाल्यामुळे मुले आपोआपच अनेक गोष्टी शिकतील. टी. व्ही. मोबाईल किंवा लॅपटॉपच्या आभासी जगातून बाहेर येतील, मैदानी खेळ खेळू लागतील व पालकांनाही मुले वाढविणे ही गोष्ट आनंददायी वाटू लागेल. मुलांशी सतत संवाद साधणे, त्यांच्याशी आजूबाजूच्या गोष्टींविषयी त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत चर्चा करणे, शाळेतील दिवसभराच्या गोष्टींविषयी गप्पा मारणे इ. गोष्टींमधून मूल आपल्यापाशी व्यक्त होऊ लागेल. त्याला मानसिक आधार मिळाला की, मूल आक्रस्ताळीपणा कमी करील व हळूहळू हेच मूल एक प्रगल्भ संयमी व सुजाण नागरिक बनून आयुष्यात यशस्वी होईल. पालकांनाही आनंददायी पालकत्व लाभेल. म्हणतात ना पालक होण सोपं आहे, मात्र पालकत्व निभावणे आजच्या काळात एक दिव्यच आहे. तरी देखील प्रत्येक पालकाला हे दिव्य पार पाडावेच लागते.

---

अवघ्या तेविसाव्या वर्षी रणांगणात हौतात्म्य पत्करणाऱ्या झाशीच्या राणीचे चरित्र स्फूर्तीदायी आहे. १८५७ च्या संग्रामात आधी झाशी, नंतर काल्पी आणि शेवटी ग्वाल्हेर येथील लढायांमध्ये आपल्या असामान्य क्षात्रवृत्तीची चुणूक दाखवून तिने ब्रिटीशांना चकित केले. झाशीचा किल्ला घेण्यासाठी ब्रिटीश सेनापती सर ह्यू रोज याला शेवटी फितुरीचा आश्रय घ्यावा लागला. आपल्या पुत्राला पाठीशी बांधून लढाई करणारी अशी असामान्य स्त्री जगाच्या इतिहासात झाली नाही! पहिल्या महायुध्दातील "गदर" पक्षाच्या देशभक्तांना, सरदार भगतसिंग यांच्या संघटनेला आणि स्वा. सावरकरांपासून ते सुभाषचंद्रांपर्यंत सर्व क्रांतीकारकांना स्फूर्ती देणाऱ्या या रण. चंडिकेचा पराक्रम व वीरमरण दैदिप्यमान  आहे.!! त्याच्या निमित्ताने कवी भा.रा. तांबे यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्यावर केलेली कविता येथे देत आहोत.

# झांशीवाली

रे हिंदबांधवा ! थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी।  
ती पराक्रमाची ज्योत मावळे, इथे झांशीवाली।।  
तांबेकुलवीरश्री ती  
नेवाळकरांची कीर्ति। हिंदुभूध्वजा जणु जळती।।  
मर्दानी राणी लक्ष्मीबाई मूर्त महाकाली।।  
रे हिंद बांधवा ।।१।।  
घोड्यावर खंदास्वार  
हातात नंगि तलवार। खणखणा करीत ती वारी  
गोऱ्यांची कोंडी फोडित पाडित वीर इथे आली,  
रे हिंद बांधवा ।। २।।  
कडकडा कडाडे बिजली। इंग्रजी लष्करे थिजली।  
मग किर्तीरूप ती उरली।  
ती हिंदभूमीच्या पराक्रमाची इतिश्रीच झाली  
रे हिंद बांधवा ।। ३।।  
मिळतील इथे शाहीर  
लवलवतील माना वीर  
तरू, झरे ढाळतील नीर। या दगडा फुटतील जिभा  
कथाया कथा सकळ काळी  
रे हिंद बांधवा ।। ४।।

**कवी - भा. रा. तांबे (१९३९)**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**
**THE DESIGN STUDIO**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# मानसी मोघे - मिस इंडीया दिवा २०१३



मूळची इंदौर– ची असलेली कु. मानसी मोघे हिने 'मिस इंडीया दिवा २०१३' या स्पर्धेमध्ये भाग घेऊन ही मानाची स्पर्धा जिंकली ही स्पर्धा मुंबई येथे हॉटेल वेस्टीनमध्ये दि. ०५.०९.२०१३ रोजी झाली.

कु. मानसी हिने बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन मध्ये नागपूर विद्यापीठाची पदवी मिळवली आहे. 'मिस इंडीया दिवा २०१३' या स्पर्धेमध्ये एकूण १४ जणींच्या स्पर्धेमधून पहिला क्रमांक मिळावला.

कु. मानसी मोघेने आजपर्यंत खालील स्पर्धांमध्ये भाग घेऊन, त्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे.

१. पॉन्डस् फेमिना – मिस एक्टीव्ह

२. २०१३ मिस इंडीया, मुंबई

३. आयकॉनिक आय फेमिना – मिस आयकॉनिक आय.

४. मिस इंडीया – पुणे २०१३

५. मिस इंडीया दिवा २०१३

आता कु. मानसी मोघे मिस युनिव्हर्स २०१३ ही स्पर्धा मॉस्को येथे दि. २ नोव्हेंबर २०१३ रोजी होत असून, त्यात सहभागी होत आहे.

आपल्या कऱ्हाडे ज्ञातीमधील मानसीला 'मिस युनिव्हर्स २०१३' या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळो अशी सर्व ज्ञातीबांधवांतर्फे शुभेच्छा!


॥ हरिहरेश्वर प्रसन्न ॥

**माऊली बिच रिसॉर्ट**

निवास व न्याहरीची उत्तम सोय

प्रो. सौ.चित्रा किरण वाकणकर

मु.पो. मारळ, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, जि.रायगड - ४०२११०

(MTDC मान्यता प्राप्त)



www.mauliresot.com

☎ ०२०-२२६०४८/६९२९९०

९२२६३७४७३१/९६३७५३९०७५



पाक्षिक

**॥आम्ही सारे ब्राह्मण॥**

ॐ प्रकाशन

पाक्षिक नव्हे एक सामाजिक चळवळ

| | | | |
|---|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | - | रू. २००/- | आजच वर्गणीदार व्हा! |
| त्रैवार्षिक | - | रू. ५००/- | |
| पंचवार्षिक | - | रू. ८००/- | |

आपण फक्त फोन करा,
वर्गणी घेण्यासाठी आम्ही आपल्याकडे येऊ!

स.नं. १/२७+२९, माऊली सोसायटी,विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, हिंगणे, पुणे ४११०५२, मोबाईल:८८०५९८१६७३

email : aamhisarebrahman@gmail.com



WITH BEST COMPLIMENTS FROM


**मे. डी.व्ही. भाटवडेकर**

६४०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,

क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. – २४४५६०४७

१९१७ पासून अहर्निश सेवा


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?

**अवधूत हर्डीकर (०२०-२५३८०२०१)**

**याच कंपनीमुळे मराठी नाटकांचा खरा प्रारंभ झाला. भास्कर बुवा बखले यांच्याकडे मराठी नाट्यसंगीताची मूहूर्तमेढ रोवण्याचे व ते लोकप्रिय करण्याचे श्रेय जाते- ते; ते या कंपनीमध्ये आले होते म्हणूनच. बाळकोबा नाटेकर, जोगळेकर, बालगंधर्व यांचे सारखे अनेक नट नामांकित झाले. मराठी नाट्यदरबार; ख्यातनाम नट-गायक,-संगीत देणारे म्युझ्किक कंपोझर्स, यांचेमुळे गजबजला. मराठी नाट्याचा हा सुप्रभात-काळ होता. आणि हा काळ अण्णासाहेब कालखंड म्हणून ओळखला जातो. आपल्या गुणवान लोकांची की र्ती आणि त्यांचे सद्गुण उच्चखाने जनतेस सांगत बोलत रहाण्याची आपापल्यांमध्ये नसलेली सवय आपण आता तरी अंगी बाणवूया यामुळे आम्ही गुणांचे कौतुक करणारे गुणग्राहक ही आहोत.**

१ अनेक क्षेत्रांमधल्या, ती कल्पना प्रथम सुचणाऱ्या व लगेच ती कार्यवाहीत आणून, नामांकित झालेल्या अशा कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वांची ओळख आपण या सदरातून करून घेत आहोत. वाचकांना, या माहितीविषयी खरीच आस्था आहे किंवा कसे? असा प्रश्न मला काहींनी विचारला. आपल्याच माणसाच्या; दोष दिग्दर्शनाचा दोष घेणे किंवा गुणांचे जाहीर कौतुक करणे या दोन्ही बाबी कऱ्हाडा व्यक्तीला मानवणाऱ्या नाहीत, हे माहीत असल्यामुळे एखाद्या जाणकार - हितैषी व्यक्तीची 'थांबवा आतां हे लिखाण' अशी स्पष्ट सूचना येईपर्यंत लिहित राहणे पसंत करावे लागते. या संबंधी च्या कोणत्याही सूचना, आपले मत; मला शिरोधार्य आहे., हे सांगितल्याशिवाय रहावत नाही.

२ **श्री. शरद किराणे (भागवत) मुंबई**

हे असे पहिलेच ट्रॅव्हल एजंट की ज्यांनी आपल्या देशांत आसाम-मेघालय-माणिपूर-मिझोराम-नागालँड-लेह-लडाख- अशा या आपल्या देशाच्या उत्तर-पूर्व भागात आणि अति पूर्वेच्या कॉम्बोडिया- व्हिएतनाम- चीन अशा देशांतून अनेक वर्षे लोकांना प्रवास घडवला आणि देशाटन करण्यास प्रोत्साहित केले. (श्री. हर्षद सरपोतदारांनी ही माहिती पुरविली आहे.)

**३) श्री. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर- गुर्लहसूर / पुणे.**

केवळ राजाश्रयाने चाललेले राजदरबारी संगीत कार्यक्रम सर्वसामान्य लोकांपुढे करण्याचें पहिले श्रेय जसे संगीतभास्कर, भास्करबुवा बखले हे आणि अशासारख्या कांहींकडे जाते; तसेच राजाश्रयाने व राजदरबारांत चाललेले मराठी नाट्यप्रकार प्रथम लोकांकरिता व लोकांपुढे आणण्याचे श्रेय श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांकडे जाते. दिनांक ३१-१०-१८८० या दिवशी म्हणजे सुमारे १३३ वर्षांपूर्वी, कालिदासाच्या अभिज्ञान शाकुंतलम् या संस्कृत नाटकाचे मराठी रूपांतर करून ते प्रथम स्टेजवर लोकांसमोर आणण्याचे श्रेय अण्णासाहेब किर्लोस्करांकडे जाते. लक्ष्मी रोड पुणे इथल्या आजच्या विजय थिएटरच्या जागी हा प्रयोग झाला. मराठी नाटकाचा हा खरा लोकांसमोर केलेला प्रारंभ होता. ते नाटक संगीत प्रधान होते. अण्णासाहेबांनी काही नाटके लिहिली. आणि जनते समोर सादर करण्यासाठी किर्लोस्कर नाटक कंपनीसुद्धा काढली. कंपनीचा उद्देश सर्वसामान्य मराठी जनतेसाठी, त्यांच्या मनोरंजनासाठी मराठी नाटके सादर करणे. याच कंपनीमुळे मराठी नाटकांचा खरा प्रारंभ झाला. भास्कर बुवा बखले यांच्याकडे मराठी नाट्यसंगीताची मूहूर्तमेढ रोवण्याचे व ते लोकप्रिय करण्याचे श्रेय जाते- ते; ते या कंपनीमध्ये आले होते म्हणूनच. बाळकोबा नाटेकर, जोगळेकर, बालगंधर्व यांचे सारखे अनेक नट नामांकित झाले. मराठी नाट्यदरबार; ख्यातनाम नट-गायक,-संगीत देणारे म्युझ्किक कंपोझर्स, यांचेमुळे गजबजला. मराठी नाट्याचा हा सुप्रभात-काळ होता. आणि हा काळ अण्णासाहेब कालखंड म्हणून ओळखला जातो. आपल्या गुणवान लोकांची की र्ती आणि त्यांचे सद्गुण उच्चखाने जनतेस सांगत बोलत रहाण्याची आपल्यांमध्ये नसलेली सवय आपण आता तरी अंगी बाणवूया. यामुळे आम्ही गुणांचे कौतुक करणारे गुणग्राहक ही आहोत. हे इतरांना समजू दे. आपल्या लोकांनी साधे कौतुकही करायचे नाही; आणि इतरांनी 'तो आपला नव्हे', म्हणून, ते करायचेही नाही या कात्रीत गुणी कऱ्हाडा सापडला आहे.

**४) श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर - किर्लोस्करवाडी-**

औद्योगिक महाराष्ट्राची खरी मुहूर्तमेढ क्रांतदर्शी श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी १८८९ मध्ये किर्लो स्करवाडी येथे रोवली. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. ढवळ्यांची प्रकाशन संस्था, पेंढारकरांची नाट्यसंस्था, किर्लोस्करांची किर्लोस्कर कंपनी या कऱ्हाडा संस्थापक संचालक असलेल्या शतायुषी

संस्था!

श्रेष्ठ क्रांतदर्शी, अनुपमेय धाडसी उद्योजक, औद्योगिक विश्वाची मुहूर्तमेढ रोवून महाराष्ट्रांतल्या अनेकांना प्रगतीच्या वाटा दाखवणारी ही व्यक्ती, एका दीपस्तंभासारखी होती. सर्व सामान्य खेड्यातील शेतकऱ्यांना लागणाऱ्या शेताच्या नांगरापासून, पाणी खेचून शेतांत खेळवणाऱ्या पाण्यांचे इंजिन निर्माते म्हणून किर्लोस्करांचे नांव सर्वतोमुखी आहे. त्यावेळेला रत्नागिरी जिल्ह्यातल्या, देवगड तालुक्यातले, भारतीय विद्यांची जपणूक परंपरेने करणारे हे घराणें, आधुनिक काळाला कर्तबगार, क्रांतदर्शी पुरूषांची रांग देणारे साठ हजारांच्या वर कुशल अर्ध कुशल कामगारांना रोजगार देणारे कीर्तिमान घराणे ठरले. या घराण्याच्या विस्तृत छत्राखाली अनेक छोटे–छोटे कारखानदार पुढे आले. अनेक महाराष्ट्रियन लोकांचे स्फूर्तीदाते पद्मभूषण शंतनुराव किर्लोस्कर यांचेच सुपुत्र! किर्लोस्कर कंपनीला यांनी जगाच्या औद्योगिक नकाशावर आणली. भारत सरकारने या दोन्ही पिता पुत्रांवर आणि त्यांच्या किर्लोस्कर कंपनीवरही पोस्टल स्टॅंप्स् काढले आहेत.

**५) पद्मभूषण श्री. शंतनुराव किर्लोस्कर पुणे–** काळाची पावले खूप आधी ओळखू शकणारा एक द्रष्टा आणि धाडसी मराठी माणूस. 'किर्लोस्कर' नाव त्यांनी सर्वतोमुखी केले. त्यांच्या अनेक योजना फलदायी झाल्या आणि द्रष्टेपण प्रत्यक्षात अवतरलं. मुळांत किर्लोस्कर ही कंपनी कुटुंबाची कंपनी होती. कसावर उतरणारा प्रामाणिकपणा, एकनिष्ठता, आत्यंतिक विश्वासार्हता, सचोटी, दक्षता, प्रत्येकाला आपली कंपनी वाटावी इतकी ओथंबलेली आपुलकी, गुणांवरच्या प्रेमाबरोबर उपजत असलेला जिव्हाळा आणि असीम कर्तबगारी बरोबर येणारी सावधानता व चिकाटी अशा एकत्र दुष्प्राप्य असणाऱ्या उदंड गुणवत्तांनी युक्त असणारे सर्व संबंधित कऱ्हाडा स्पिरीटनं भारलेली व्यक्तिमत्त्वें त्यांना दैवी देणगी सारखी मिळाली. सर्वश्री शंभुराव जांभेकर, नानासाहेब गुर्जर, बापूसाहेब बोंद्रे, टिकेकर, व्ही. एम् हर्डीकर आणि अशीच इतर मंडळी व्यक्तिगत 'मीपणा' विसरून एकाच धेय्यासाठी समर्पित झालेली! या भावना जिथपर्यंत होत्या तिथपर्यंत किर्लोस्कर कंपनीचा चढा आलेखच राहिला. या सर्व कर्तबगार द्रष्टेपणाच्या एकजुटीने किर्लोस्कर कंपनी भारतातील पहिल्या वीस कंपन्यांमध्ये होती. या कंपनीबाबत काही उत्साहित करणारी बातमी आम्हाला उत्साहित करीत असे. अनेक शहरांतल्या मध्यमवर्गीयांचा आर्थिक विकास आणि पर्यायाने शहराचा विकास किर्लोस्कर कंपनीमुळे झाला. २००३ साली शंतनुरावांवर भारत सरकारने पोस्टल स्टॅंम्प काढला होता. भारताच्या शिक्षणप्रणालीमध्ये मॅट्रीकला अनुत्तीर्ण झालेली व्यक्ती, वडिलांनी शिक्षणासाठी अमेरिकेत पाठविल्यानंतर; इकडे येऊन, किर्लोस्कर कंपनीची बासष्ट हजारांच्याहून अधिक लोकांना नोकरी देऊ शकणाऱ्या किर्लोस्कर कंपन्यांची मालक म्हणून होती. या गोष्टी बरेच काही सांगून जातात. त्याचे वस्तुस्थितीवर आधारलेले तार्किक चिंतन आपणाला आपल्या जीवनात मार्गदर्शक ठरते, किर्लोस्करांचा उत्कर्ष सहन न होण्याची मानसिकता शेवटी आधुनिक काळातलं संपाच हत्यार घेऊन उभी ठाकली. तेव्हा तो संप शंतनुरावांनी कणखरपणे व मुत्सद्दीपणाने मोडून काढला. म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडून त्यांच्या निषेधाचे पत्र व 'पद्मभूषण' मिळाल्याबद्दल सत्काराचे पत्र एकाच दिवशी मिळाल्यानंतर निषेध स्वीकारल्याचे व सत्कार नम्रपणाने नाकारल्याचे पत्र कॉर्पोरेशनला पाठविणारे हे बाणेदार व्यक्तिमत्त्व होते. पुढच्यांना आदर्श म्हणून या अशाच मोठ्या लोकांच्या गोष्टी कायमच्या ठेवी म्हणून आमच्या मनात राहतात.

**६) नितीन कीर्तने पुणे–** सोळा वर्षांखालील मुलांची टेनिसमधली राष्ट्रीय चॅंपियनशिप तीन वेळा मिळविणारा नितीन कीर्तने (जन्म १९७५) पहिलाच! मोठ्यांच्या विभागामध्ये सुद्धा टेनिस मधली राष्ट्रीय चॅंपियनशिप याने १९९६ साली पटकावली. वासुदेव रेड्डीला त्याने यावेळी पराभूत केले होते. श्री. संदीप की र्तने, श्री नितीन कीर्तने व श्री, सलील की र्तने हे तीनही भाऊ टेनिसमधले चॅंपियन्स होते. आणि या प्रत्येकाने ताकदवान प्रतिस्पर्ध्याला हरवून चॅंपियनशिप मिळवली होती. गुणी कऱ्हाडयांचा सार्थ अभिमान ज्यामुळे जागा राहतो; अशांचे आधार म्हणून ही अशीच मंडळी असतात.

**७) श्री. विनायक जनार्दन कीर्तने, पुणे.** अण्णासाहेब किर्लोस्कर–पर्व, ज्यांनी पहिले मराठी संगीत प्रधान नाटक स्टेजवर आणले; त्या आधी जवळ जवळ १८ ते २० वर्षे ज्यांनी स्वतंत्र विषय घेऊन गद्य मराठी नाटक–थोरले माधवराव पेशवे म्हणून लिहीले; १८६१ साली प्रसिद्ध केले; आणि तेच नाटक १८६६ मध्ये इचलकरंजीकर नाटक कंपनीने स्टेजवर आणले ते श्री वि. ज. कीर्तने यांचे होते. १८६७ मध्ये त्यांचा 'मराठी बखर' या शीर्षकाने प्रसिध्द झालेला प्रबंध वजा दीर्घतर लेख, त्यांना पहिले मराठी इतिहासकार ठरवतो. श्री वासुदेव शास्त्री खरे हे इतिहासकार; श्री. वि. ज. कीर्तने यांच्या लिखाणाच्या प्रभावाखाली होते. व आपण कीर्तने यांचेसारखेच इतिहासकार व्हायचे असे त्यांनी ठरवले होते.

आज येथेच थांबतो, श्रेष्ठ कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देण्याचा हेतु अशा गुणवान माणसांसारखे आपण व्हावे हा आहे. त्यांनाही अनेक प्रकारची प्रतिकूल परिस्थिती आणि गटबाजी करून खाली ओढणारी माणसे होती. पण त्या सर्वांना टक्कर देऊन ही मंडळी वर आली होती. हे जाणून घ्यावे; तसेच आपणही हे सद्‌गुण आत्मसात करावे आणि पर्यायाने सद्‌गुणी पूर्वजांचे सद्‌गुणी वारसदार ही म्हण रूढ करावी. यांचेखेरीज नमस्कार तो कोणाला करायचा? याच करिता नेहमी वाचनात ठेवा.

# विविधज्ञ कऱ्हाडे

श्रीपाद दामोदर सप्रे. ९८१९८११३९१

जीवनाचे अक्षरशः कोणतेही अंग घ्या, त्यामध्ये कऱ्हाड्यांनी आपला ठसा उमटवला आहे. धर्म आचरण आणि प्रसारणापासून सुरु वात करायची तर सर्वज्ञानी श्री चक्रधरस्वामी, ज्यांनी महानुभव पंथाची स्थापना करून, समाजाला एक दिशा दिली. परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे स्वामी, धर्मसिंधूकार बाबाभट्ट पाध्ये, ज्यांच्यामुळे बाब वाक्यं प्रमाणम् हा वाक्प्रचार प्रचलित झाला. ब्रम्हर्षि पंडित सातवळेकर, महापहोपाध्याय पद्मभूषण डॉ. मिराशी, महामहोपाध्याय पद्मभूषण, पद्मश्री अशा पदव्या भूषवणारे अनेक विद्वान कऱ्हाडे ज्ञातीमध्ये जन्मले. धर्म आचरण आणि प्रसारणापुरते बोलायचे तर आजही हे काम भारताचार्य सु.ग.शेवडे, दाजीशास्त्री पणशीकर, सच्चिदानंद शेवडे यांच्याद्वारे होत आहे. बंधुभगिनिंनो कऱ्हाडे जातीचा विचार करताना आपल्या असे लक्षात येईल की, आपल्या तल्लख बुध्दीमत्तेचा, सद्सदविवेक बुध्दीचा, समाजोपयोगी वृत्तीचा समन्वय साधत कऱ्हाड्यांनी समाजकारणात आणि राजकारणात आपला स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे.

आपणा सर्वांना कल्पना आहेच की कऱ्हाडे ब्राह्मण जातीकडे आदराने बघितले जाते. कऱ्हाडे जातीचा इतिहास थोडाथोडका नव्हे तर शेकडो वर्षांचा आहे. सरदेसाई कुटुंबीयांच्या कुलवृत्तांताच्या प्रस्तावनेमध्ये सुप्रसिध्द राजकीय नेते आणि साहित्यिक कै. ना. ग. गोरे यांनी असे म्हटले आहे की, कऱ्हाडे ब्राम्हण हेच आद्य ब्राम्हण आहेत, ज्यांचा इतिहास तिसऱ्या चौथ्या शतकापर्यंत गेलेला आढळतो. सर्वगुणसंपन्न म्हटल्यानंतर जे गुण डोळ्यासमोर येतात. ते सर्व गुण कऱ्हाडे जातीमध्ये आढळतात. इतर पुढारलेल्या ज्ञातींचा तुलनात्मक अभ्यास केला तर कऱ्हाडे हे लोकसंख्येच्या दृष्टीने अत्यल्प ठरतात. परंतु गुणात्मक तुलना केली तर नक्कीच सरस ठरतात. अर्थात संख्येने कमी असल्यामुळे आपण एकजुटीच्या राजकारणात किंवा ज्याला इंग्रजीत लॉबींग स्कील म्हणतात आणि ग्राम्य भाषेत झुंडीचे राजकारण म्हणतात यामध्ये मागे पडलो.

जनगणनेमध्ये पोट–जातींचा उल्लेख होत नसल्यामुळे, तंतोतंत आकडेवारी आज उपलब्ध नाही तथापि काही ठोकताळ्यांचा आधार घेतला; तर आपली लोकसंख्या दीड लाखाच्या आसपास आहे असे दिसते. जिज्ञासूंनी खोलात जाऊन अभ्यास करण्यास हरकत नाही. दिडशे कोटी लोकांच्या देशामध्ये अवघे दिड लाख कऱ्हाडे .

कऱ्हाड्यांमध्ये आत्माभिमान, आत्मनिर्भरता, आदर्शवाद, उदारता, विश्वासार्हता, तत्ववाद, मनमोकळेपणा इत्यादि गुण दिसतात. आपण जरी तत्ववादी असलो तरीही आणि आपला मुद्दा सडेतोडपणे मांडला तरीही वितंडवादापासून चार हात लांब रहाणे पसंत करतो. किंबहुना आपल्या मुद्याशी आणि तत्वाशी चिकटून राहताना प्रसंगी आपल्या नफ्याफायद्यावर पाणी सोडण्याची कऱ्हाड्यांची तयारी असते.

कऱ्हाड्यांमध्ये स्वत:ची टिमकी वाजवण्याची वृत्ती नसते. हा निश्चितच एक गुण आहे असे म्हणायला हरकत नाही. परंतु टोकाची प्रसिध्दी पराङमुखता हा गुण म्हणावा की दोष ? आजच्या युगात खरं म्हणजे तो दोषच. आणि या दोषांमुळेच अनेक गुणवान, कर्तबगार कऱ्हाड्यांचे नामोनिशाण मिटवले गेले. या उपर कित्येकांचे श्रेय देखील उपटसुंभांनी लाटलेले दिसते. याला इतिहास साक्षीदार आहे. वाद निर्माण करणे हा या लेखाचा हेतू नाही. परंतु मतांतरे असल्यास या बद्दलचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. ज्या कऱ्हाड्यांनी समाजाकरंता अनेकविध क्षेत्रांमध्ये आपले योगदान दिले आहे त्यांना पुरेशी प्रसिध्दी मिळू शकलेली नाही. इच्छुकांनी इतिहासाची पाने चाळल्यास असे लक्षात येईल की, या व्यक्तींवर काही लिहायचे झाल्यास एक प्रचंड मोठा संदर्भ ग्रंथ तयार होऊ शकतो. ज्यामुळे केवळ कऱ्हाडे ब्राम्हणांचीच नव्हे तर एकूणच भारतीय समाजाची छाती अभिमानाने फुलून येइल; परंतु दुर्दैवाने इतरांनी याची नोंद घेतली नाही आणि कऱ्हाड्यांनी नोंद ठेवली नाही.

जीवनाचे अक्षरश: कोणतेही अंग घ्या, त्यामध्ये कऱ्हाड्यांनी आपला ठसा उमटवला आहे. धर्म आचरण आणि प्रसारणापासून सुरु वात करायची तर सर्वज्ञानी श्री चक्रधरस्वामी, ज्यांनी महानुभव पंथाची स्थापना करून, समाजाला एक दिशा दिली. परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे स्वामी, धर्मसिंधूकार बाबाभट्ट पाध्ये, ज्यांच्यामुळे बाब वाक्यं प्रमाणम् हा वाक्प्रचार प्रचलित झाला. ब्रम्हर्षि पंडित सातवळेकर, महापहोपाध्याय पद्मभूषण डॉ. मिराशी, महामहोपाध्याय पद्मभूषण, पद्मश्री अशा पदव्या भूषवणारे अनेक विद्वान कऱ्हाडे ज्ञातीमध्ये जन्मले. धर्म आचरण आणि प्रसारणापुरते बोलायचे तर आजही हे काम भारताचार्य सु.ग.शेवडे, दाजीशास्त्री पणशीकर, सच्चिदानंद शेवडे यांच्याद्वारे होत आहे.

बंधुभगिनिंनो कऱ्हाडे जातीचा विचार करताना आपल्या असे लक्षात येईल की, आपल्या तल्लख बुध्दीमत्तेचा, सद्सदविवेक बुध्दीचा, समाजोपयोगी वृत्तीचा समन्वय साधत कऱ्हाड्यांनी समाजकारणात आणि राजकारणात आपला स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे.

क्रमश:

*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com



**With Best Compliments**

**Dynamic Engineers**

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**





**सातारी पेढा शॉप**

संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

**पौष्टीक खाद्य भांडार**

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)

सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

SHREE ANNAPURNA CATERERS

## श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

## श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# दिनांक २१/०७/२०१३ च्या डोंबिवली येथील सभेचा इतिवृत्तांत

**शब्दांकन -गणेश गुर्जर**

**या व्याधीशी यशस्वी सामना करुन जगण्याची, नवी जिद्द निर्माण करण्याचे काम केले आहे. याशिवाय त्यांना कोणत्याही वेळी गरज पडली तर, संपर्क साधता यावे म्हणून मी माझा मोबाईल २४X७ (सतत)अखंड चालू ठेवून, एक हेल्पलाईनही उपलब्ध करुन दिली आहे. अगदी मध्यरात्रीही पेशंट वा घरच्यांना अस्वस्थ वाटू लागले तरी ते माझ्याशी संपर्क साधून आपला ढासळलेला आत्मविश्वास परत मिळवू शकतात. गरजूंना औषधे आणि उपचार यात मदत मिळवून देण्यातही मी प्रयत्नशील असते. त्यासाठी 'गॅलक्सी'च्या डॉ. शैलेश यांपासून वॉर्डबॉईजपर्यंत सर्वांचे भरघोस सहाय्य मिळते. काही सेवाभावी मंडळी व संस्थाही आता माझ्या मदतीसाठी पुढे येत आहेत.**

डोंबिवली संघाने ''संपर्क'' त्रैमासिकाबाबत दि. २१/०७/२०१३ रोजी सभा बोलावली होती. संपर्कचे संपादक प्रकृती अस्वास्थ्यामुळे व कार्यवाह हे परगांवी असल्यामुळे पुणे संघाचे अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य अनुक्रमे गणेश गुर्जर व हेमंत पुराणिक उपस्थित होते. या सभेचा इतिवृत्त खालील प्रमाणे-

सभा सायं ५.१५ मि. सुरू झाली. सूत्र संचालन श्रीमती स्वाती प्रभुदेसाई यांनी केले. श्री. सुहास भागवत यांना त्यांनी विनंती केली की, सर्व प्रथम संपर्कबाबत सभेत माहिती द्यावी. त्यानंतर सभेस उपस्थित सदस्यांना विनंती करण्यात आली की, संपर्कबाबत सूचना, तक्रारी, अभिप्राय सभेपुढे नोंदवावेत. त्यानुसार सर्वप्रथम श्रीमती उषाताई कशेळकर यांनी संपर्क त्रैमासिकाचे सध्याचे अंक कलरफुल असून, उत्तम प्रकारे त्यामध्ये माहिती लेख असतात. विशेषत: कॅन्सर माझा सांगाती हा लेख खूप काही सांगून जातो. सूचना म्हणून पुस्तक परिक्षण सदर सुरू करावे. अभिप्राय म्हणून संपर्कला शुभेच्छा देण्यासाठी एक कविता सुचली ती त्यांनी वाचून दाखवली. या नंतर श्री. प्रभाकर कोनकर, भूतपूर्व संपादक संपर्क, यांनी पुस्तक परिक्षण सूचनेबद्दल भाष्य केले. पुस्तक परिक्षण जर लेखकाच्या हाती पडले; तर तो कोर्टात केस करू शकतो असे सांगितले. संपर्कचा अंक सध्या उत्तमप्रकारे निघत आहे परंतु सध्याची आर्थिक स्थिती कशी आहे? पूर्वी जमलेल्या निधीतूनच हा अंक निघत असेल तर योग्य नव्हे, त्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज नाही म्हणून बोलत आहे असे नमूद केले. त्यानंतर त्रैमासिकाची पाने वाढवावी, कविता, चारोळ्या, वार्षिक भविष्य अशांचा अंर्तभाव करावा अशा प्रकारच्या सूचना उपस्थितांमधून आल्या. वधुवरांची माहीती त्रैमासिकातून द्यावी. जाहिराती वाढवाव्यात, दिवाळी अंक काढावा अशी सूचना डॉ. कानेटकरांनी केली; तर संपर्क च्या सभासदांसाठी सहल काढावी अशी सूचना श्री प्रकाश जठार यांनी केली. तसेच पूर्वी क्रमश: असे लेख येत असत ते सुरू ठेवावे. ज्ञातीमधील कर्तबगार व्यक्तींचा परिचय द्यावा.

वरील सर्व सूचनांवर उत्तरे, माहिती द्यावी अशी विनंती श्रीमती स्वाती प्रभुदेसाई यांनी श्री. गणेश गुर्जर यांना केली.

श्री. गणेश गुर्जर यांनी डोंबिवली संघाचे आणि विशेषत: श्रीमती स्वाती प्रभुदेसाईचे हार्दिक अभिनंदन केले की ही सभा संपर्कच्या वृद्धीसाठी घेतली ही कल्पनाच उत्तम आहे. आणि ही अन्य संघांनी राबवावी असे सुचवले. श्री. गुर्जर यांनी सर्व प्रथम संपर्कच्या आर्थिक स्थितीचे बाबत श्री. कोनकर यांनी व्यक्त केलेल्या शंकेचे निरसन केले ते म्हणाले संपर्कची जबाबदारी जेव्हा पुणे संघाने स्वीकारली त्यावेळी जी रक्कम होती त्याला कोणतीही तोशीश न लावता जाहिराती, रंगीत जहिराती यांच्या माध्यमातून रू ६०,०००/- गोळा केले. सभासदांकडून आलेली वार्षिक वर्गणी यासाठी वापरली नाही व पहिल्या रू

१.५० लाख मध्ये रू. ८०,०००/– ची भर घातली आहे. या शिवाय अंक रंगीत पाने व कागदाची प्रत यांत बदल केला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे १ वर्षाच्या अवधीमध्ये संपर्कचे **RNI** कडे रजिस्ट्रेशन ही पुणे संघाची जमेची बाजू आहे. व या संघाची आर्थिक बाजू उत्तम आहे. अन्य सूचना तक्रारींबाबत माहीती देतांना श्री. गुर्जर म्हणाले की, पुस्तक परिक्षणाऐवजी पुस्तकावरील अभिप्राय लेखकांस पूर्व सूचना देऊन घेता येईल. वाढदिवसानिमित्त सभासदांनी पुस्तके द्यावी या सूचनेवर त्यांच्या मेंटेनन्सची उस्तवार करणे, तसेच आलेली पुस्तके कुठे ठेवणे त्याचे रेकॉर्ड ठेवणे अशा अनेक समस्या आहेत. त्याच प्रमाणे सभासदांची सहल प्रत्येक संघाने आयोजित करावी. वार्षिक भविष्य देण्याची सूचना उत्तम आहे. त्यासाठी एका त्रैमासिकामध्ये उदा. जाने. अथवा ऑक्टो असावा. कविता, चारोळ्या, लेख सभासदांनी पाठवावेत त्याची दखल घेऊन जागेच्या उपलब्धतेनुसार छापता येतील. ही सुचना योग्य असून त्यासाठी विविध साहित्य जाहिराती मिळवणे महत्वाचे आहे. पुढील वर्षी हा प्रयत्न करू. जर जास्त साहित्य आले, संस्थावृत्त सर्व संस्थाकडून आले; तर पाने वाढवता येतील. वधुवरांची माहिती ही प्रत्येक संघाने जर पाठवली तर त्याचा समावेश करता येईल. कर्तबगार व्यक्तींचा परिचय द्यावा. दिवाळी विशेषांक काढणे ही सूचना चांगली आहे. सध्या संपर्कच्या शेवटच्या पानावर कर्तबगार चार व्यक्तींचे फोटो देत आहोत की ज्यांनी विविध क्षेत्रात ख्याती प्राप्त केलेली आहे. या बाबत महासंघाच्या सभेमध्ये हा विषय मी मांडला होता की दिनदर्शिका काढावी. पण त्यापेक्षा छोटी माहिती पुस्तिका तयार करावी या सूचनेचा विचार विनिमय सुरू आहे. क्रमश: लेखाबाबत आलेल्या सूचनेवर शक्यतो ते चालू ठेवण्याचा प्रयत्न राहील. पण लेख सुटसुटीत असल्यास क्रमश: ची आवश्यकता भासणार नाही. वितरणाबाबत सध्या सर्व संघांकडे अंक तिकीट लावून कुरिअर द्वारे पाठवले जातात व ते पुढे प्रत्येक संघाने लोकल पोस्टात टाकावे म्हणजे अंक नक्की मिळतील. डोंबिवली संघाने कल्याण व अंबरनाथ ला वेगळे प्रतिनिधी नेमावेत, म्हणजे तेथील वितरण सोपे होईल. वार्षिक वर्गणी ज्या त्या संघाने गोळी करावी व अंकाचे वितरण लेख साहित्य घेऊन ते पुण्यास पाठवल्यास सर्व गोष्टी सुरळीत होतील असे प्रतिपादन केले. सरतेशेवटी डोंबीवली संघ व श्रीमती स्वाती प्रभुदेसाई आणि उपस्थित सभासदांचे प्रति धन्यवाद प्रकट केले.चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.


सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!




कोंकण काजू

उत्पादक :

कोकण काजू सांडगी मिरची

फणस–तळलेले गरे काजूकतली

प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१



# अध्यात्म–योग

## ग्रंथकार– प्रा. अवधूत हर्डीकर

भारतीय अध्यात्मविद्या आणि योगविद्यांचा एकत्र सुलभ परिचय घडविणारा ग्रंथ वैशिष्ट्ये (१) पाने ६६४. (२) पांचशेहून अधिक परिभाषांचे स्पष्टीकरण (३) सहा विभाग आणि सत्तावन्न प्रकरणे (४) विद्वन्मान्य ज्ञानकोशांचे स्वरूप असलेला

(५) वैदिक वाड;मय, शंकराचार्य रामानुजाचार्य गोरक्षनाथ पातंजल योगविद्या, लययोग, हठयोग, राजयोगांचे विवरण, काश्मीर शैवागम, संतांचे विचारांसह आधुनिक विचारवंतांची विचारसंपदा, एवढ्या सर्व विभिन्न आयामांसह जीवनानुभवावरचे भाष्य असलेला, अध्यात्म–योगाविषयी यथार्थ मार्गदर्शन करणारा एक बृहत् – ग्रंथ. आपले संग्रही हवाच आहे.

**उपलब्धि-**

१. श्री बाळासाहेब काजरेकर वा श्रुति मंगलकार्यालय पुणे ४११००४.

२. श्री. दीपक पळसुले
मु.पो. कशेळी ता. राजापूर जि. रत्नागिरी –४१६७०७.

३. हर्डीकर
१६–ए गणेशकृपा सोसायटी परमहंसनगर, पौडरोड पुणे –४११०३८.

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. Max Distance between spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range | rpm | (8)75-1850 | (8) 80-2310 |
| Vertical adjustment of arm | mm | 533 | 660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

काटदरे

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

## चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

# काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

## ॥ संस्था वृत्त



रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघाच्या व्यवस्थापक समितीचे सदस्य, श्री. सुनील मनोहर जठार यांचे सामाजिक कार्य मोठे आहे. सामाजिक बांधिलकीचा विचार करून, समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'रविकिरण समाजश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे मप्रगती महिला शैक्षणिक समाजिक विकास, नाशिक संस्थेने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०१३ प्रदान केला आहे, तसेच श्री. सुनिल जठार यांना तृतीय कोकण गौरव पुरस्कार २०१३, हा हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था कराड यांनी प्रदान केला आहे. श्री. सुनिल मनोहर जठार यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा.

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबई आयोजित

**''श्रावणसंध्या''**

श्रावण म्हणजे
कोवळ्या उन्हासोबत अलगदशी सर बरसणारा,
अवखळ वाऱ्याची अल्लडशी लहर आणणारा,
पानाफुलांचा अनोखा बहर फुलविणारा,
तुषार किरणांनी इंद्रधनूचा गोफ विणणारा,
व्रतवैकल्यांनी सणांचे पावित्र्य जपणारा,
सासर-माहेरच्या नात्यांचे बंध दृढ करणारा,
सुहासिनी अन् ललनांचा आनंद खुलविणारा,
आप्त व स्नेह्यांच्या भेटींचे क्षण साकारणारा

या श्रावण महिन्यांचे औचित्य साधून मुंबईच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाने या वर्षीचा श्रावण संध्या कार्यक्रम दि. १ सप्टेंबर २०१३ रोजी मोठ्या दिमाखांत साजरा केला.

श्रीमती स्मिता तळवलकर प्रसिद्ध अभिनेत्री, निर्माती व दिग्दर्शिका यांचा 'कऱ्हाडे भूषण' या पुरस्कार सन्मानानें सत्कार हे या कार्यक्रमांचे खास वैशिष्ट्य

समारंभासाठी सन्माननीय अतिथी म्हणून शिवशाहीर डॉ. बाबासाहेब पुरंदरे व ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांची उपस्थिती यामुळे या समारंभाला वेगळीच शोभा आली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धांत श्रीमती कविता कोळी व त्यांचे ५० सहकारी यांनी 'सणांच्या ग माहेरी' हा हिन्दु सण व स्त्रीशक्ती यावर आधारित भव्य संगीत नृत्याविष्कार सादर केला.

सभासद व त्यांचे नातेवाईक, हितचिंतक व अनेक मान्यवर या सर्वांनी या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पुर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |

**मागील अंकात अनावधानाने झालेले अनेक मुद्रणदोष आमच्या निदर्शनास आणून दिले गेले आहेत. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.**

**यापुढे अशा चुका होणार नाहीत यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.**

**संपादक**

# केल्याने परदेशाटन

**श्री. सुधीर करंबेळकर ९०११०६३०३०**

**इंग्लंडमधील शिस्त, स्वच्छता, आधुनिकतेची जोड देऊन पारंपरिक गोष्टींची केलेली नीटनेटकी जपवणूक, हॉलंडची उद्यमशीलता, फ्रान्सचे रंगबेरंगी रंगेलपण, स्वित्झर्लंडमधील स्वर्गीय अनुभव देणारे पर्यटन, ऑस्ट्रीयाची संपन्नता, इटलीमधील रोमन सम्राट, संशोधक, मूर्तिकार, वास्तुविशारद, चित्रकार यांनी निर्माण केलेल्या गोष्टी वास्तू पाहताना खरोखरच अनोख्या जगात असल्यासारखे वाटते आणि ही आनंदयात्रा संपूच नये असे वाटते. आणि आपल्याकडे ? बुध्दी आहे पण त्याची कदर नाही. नैसर्गिक साधनसंपत्ती आहे पण योग्य नियोजन नाही. फक्त पाश्चिमात्यांच्या स्वैरतेचे अंधानुकरण, बेशिस्त, कायदेमोड, भ्रष्टाचार हेच आपले आदर्श आहेत.**

समाजातील अनेक व्यक्ति आयुष्यामध्ये काही ना काही स्वप्न उराशी बाळगून असतात. आम्ही पती-पत्नीने असेच एक स्वप्न पाहिले होते, ते म्हणजे हात पाय धड असेपर्यंत एकदा का होईना पण युरोपवारी करायची. स्वप्न अर्थातच सत्यात उतरले, पण वयाच्या साठीच्या दशकात. पण हेही नसे थोडके.

सातारा येथील ग्लोबल ट्रॅव्हल्सतर्फे मे २०१३ च्या अखेरीस हा स्वप्नातीत योग जुळून आला. तसा आमच्या गाठीशी अमेरीका भेटीचा अनुभव होता. पण अमेरिका म्हणजे दिव्यता आणि युरोप म्हणजे नैसर्गिक सुंदरता. पृथ्वीवरची ही दोन्हीही ठिकाणे एकदा तरी पहावी अशीच.

आमचा एकूण ३० जणांचा ग्रुप होता. त्यामध्ये एकुलते एक तरूण जोडपे सोडले; तर बाकी सगळे ज्येष्ठ नागरिक आणि बहुतेक आजी-आजोबा किंवा पणजी-पणजोबा असे डबल ग्रॅज्युएट, बहुतांशी ग्रामीण भागातील होते.

३० मे च्या पहाटे आम्ही मुंबईहून विमानाने उड्डाण केले आणि प्रथम इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवला. दोन दिवसांच्या मुक्कामात पार्लमेंट स्क्वेअर, बकिंगहॅम पॅलेस, मादाम तुसाँवॅक्स म्युझियम, लंडन आय ही लंडन शहरातील ऐतिहासिक जगप्रसिध्द ठिकाणे पाहिली. त्यानंतर १२ मजली क्रुझमधून प्रवास करून, हॉलंड देशातील ॲमस्टरडॅम येथे आलो. येथे मडूरोमॅडम येथील मिनी हॉलंड ची प्रतिकृती बनविलेले अप्रतिम ठिकाण पाहिले व छोट्या क्रुझमधून ॲमस्टरडॅमची सफर केली. इथून बेल्जीयम या देशात ब्रुसेल्स शहरात मुक्कामाला गेलो. या शहराच्या अलीकडे पूर्णपणे स्टीलमध्ये बनविलेली मअणूफची भव्य प्रतिकृती पाहिली. दुसऱ्या दिवशी ब्रुसेल्स शहरातील ग्रँड प्लेस हा ऐतिहासिक चौक आणि मॅनीकेन पीस स्टॅच्यू (शू करणाऱ्या मुलाचा पुतळा) पाहिले. बेल्जीयम मधून आम्ही फ्रान्स मध्ये पोहोचलो. पॅरिसमधील दोन दिवसांच्या मुक्कामात, पॅरिसमधील जगप्रसिध्द आयफेलटॉवर, ऐतिहासिक इमारती, लिडो शो, कॉंक्वर्ड चौक, डिस्नेवर्ल्ड अशी स्थळे पाहीली. फ्रान्समधून पुढे युरोपचे नंदनवन असणाऱ्या, नयनरम्य नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या आणि आल्प्स् पर्वतराजींच्या कुशीत असणाऱ्या स्वित्झर्लंड देशातील एंजेलबर्ग येथे मुक्कामास पोहोचलो. या तीन दिवसांच्या मुक्कामात माऊंट टिटलीज् ज्यूंगफाऊ हे युरोपातील सर्वात ऊंच शिखर निसर्गरम्य लूसार्न शहर अशी डोळ्याचे पारणे फेडणारी ठिकाणे पाहीली. १०,००० हजार फुटांपेक्षा ही उंच आणि पांढऱ्या शुभ्र बर्फाने पूर्णपणे आच्छादलेल्या पर्वत शिखरांवर स्वीस सरकारने केलेला पर्यटन विकास पाहिला की, तोंडात बोट घालायचे बाकी राहते. जड मनाने स्वित्झर्लंडचा निरोप घेतला आणि ऑस्ट्रीया या चिमुकल्या देशातील इन्सब्रुक या गावात आलो. या प्रवासाच्या दरम्यान स्वित्झर्लंड-जर्मनी देशांच्या सीमेवर असणारा ऱ्हाईन फॉल्स हा युरोपचा मिनी नायगारा आणि वारवोस्की क्रिस्टल म्युझीयम पाहिले. इन्सब्रुकमध्ये मगोल्डन दाचीफ हा सोनेरी कौलांचा सज्ज असलेला प्रासाद पाहिला. हा देश छोटा असला तरी संपन्न असून, दोनवेळा हिवाळी ऑलिंपिक भरवण्याचा मान त्यांनी मिळवला आहे. इथून यूरोप ट्रीपमधील शेवटचा देश मइटलीफ मध्ये आलो. इथेही ३ दिवसांच्या वास्तव्यात व्हेनीस, फ्लॉरेन्स पीसा येथील कलता मनोरा, रोम, व्हॅटीकन सिटी ही रोमन संस्कृतीच्या ऐतिहासिक खुणा अंगावर बाळगणारी जगप्रसिद्ध ऐतिहासिक स्थळे पाहिली व भारतात परतलो.

इंग्लंडमधील शिस्त, स्वच्छता, आधुनिकतेची जोड देऊन पारंपरिक गोष्टींची केलेली नीटनेटकी जपवणूक, हॉलंडची उद्यमशीलता, फ्रान्सचे रंगबेरंगी रंगेलपण, स्वित्झर्लंडमधील स्वर्गीय अनुभव देणारे पर्यटन, ऑस्ट्रीयाची संपन्नता, इटलीमधील रोमन सम्राट, संशोधक, मूर्तिकार, वास्तुविशारद, चित्रकार यांनी निर्माण केलेल्या गोष्टी वास्तू पाहताना खरोखरच अनोख्या जगात असल्यासारखे वाटते आणि ही आनंदयात्रा संपूच नये असे वाटते.

आणि आपल्याकडे ? बुध्दी आहे पण त्याची कदर नाही.

नैसर्गिक साधनसंपत्ती आहे पण योग्य नियोजन नाही. फक्त पाश्चिमात्यांच्या स्वैरतेचे अंधानुकरण, बेशिस्त, कायदेमोड, भ्रष्टाचार हेच आपले आदर्श आहेत. तरीसुध्दा आपणच आपल्या पाठीवर थाप मारून घेतो आणि म्हणतो ''मेरा भारत महान''

# एक कर्तबगार महिला




नाव – शोभा नाखरे
बी. ए. ला मुंबई विद्यापीठात तृतीय क्रमांक
लोटस फाउंडेशनची शिष्यवृत्ती
एम्. ए. (संस्कृत व मराठी)
१९९० पासून १२ वर्षे दहावीच्या विद्यार्थ्यांना १०० गुणांच्या पेपरसाठी संस्कृतचे अध्यापन
१९८७ पासून Central School for the Deaf आग्रीपाडा मुंबई येथे शिक्षिका व
२०११ पासून आजपर्यंत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत.
१९९३ N.C.E.R.T. दिल्लीचा राष्ट्रीय पुरस्कार
२००९ 'कर्तत्ववान महिला महापौर' पुरस्कार
२०१० National Society for the Equal Opportunity for the Handlcapped चा अपंगांसाठीचा पुरस्कार NCED INDIA च्या राष्ट्रीय परिषदेत वाचलेल्या पेपरला ३ वेळा पुरस्कार
हिंदी विज्ञान साहित्य परिषदेचा 'अहिंदी भाषी' पुरस्कार ५०० हून अधिक पुस्तकांचे परिक्षण
महाराष्ट्र शासनाच्या अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व निवेदन
२०१२ राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार
५ सप्टेंबर २०१३ रोजी दिल्ली येथे, राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी
घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा

# ‘संपर्क‘चा इतिहास

**श्री. सुहास भागवत**

**या मुखपत्राचे नाव मसंपर्कफ असे असावे व सध्या ते वार्षिक स्परूपात असावे असे ठरले. त्याबाबतची जबाबदारी तत्कालीन कार्यवाह या नात्याने डोंबिवली संघाने घेतली. डोंबिवली संघाचा सर्वात मुख्य असलेला संक्रांत संमेलनात तो प्रसिद्ध करावा असे ठरले. त्यासाठी त्यावेळी संपर्कात असलेल्या सुमारे पंधरा सदस्य संस्थांना माहिती पाठविण्याचे अवाहन करण्यात आले. अतिशय मोजक्या संस्थांकडून माहिती येण्यास सुरूवात झाली व त्यातील माहीतीच्या आधारे छोट्या आकारातील आठ पानी हस्तलिखित प्रत तयार करून, त्याचे प्रकाशन १९९७ च्या जानेवारीत संक्रांत संमेलनात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच्या फोटोप्रती काढून सर्व ज्ञात सस्थांना पाठविण्यात आल्या.**

भारतीय कऱ्हाडे ब्राम्हण महासंघाच्या सुरूवातीस झालेल्या सभांमध्ये कोणता तरी ठोस निर्णय घेऊन अंमलबजावणी करणे यावर एकमत होत होते. पण असा कोणता नेमका उपक्रम सुरू करावा यावर चर्चा होत असताना, आपल्या रौप्य महोत्सवी वर्षात ठाणे संघाने आयोजित केलेल्या (१९९६). महासंघाच्या सभेने, एखादे मुखपत्र सुरू करावे यावर एकमत झाले.

या मुखपत्राचे नाव ‘संपर्क‘असे असावे व सध्या ते वार्षिक स्परूपात असावे असे ठरले. त्याबाबतची जबाबदारी तत्कालीन कार्यवाह या नात्याने डोंबिवली संघाने घेतली. डोंबिवली संघाचा सर्वात मुख्य असलेला संक्रांत संमेलनात तो प्रसिद्ध करावा असे ठरले. त्यासाठी त्यावेळी संपर्कात असलेल्या सुमारे पंधरा सदस्य संस्थांना माहिती पाठविण्याचे अवाहन करण्यात आले.

अतिशय मोजक्या संस्थांकडून माहिती येण्यास सुरूवात झाली व त्यातील माहीतीच्या आधारे छोट्या आकारातील आठ पानी हस्तलिखित प्रत तयार करून, त्याचे प्रकाशन १९९७ च्या जानेवारीत संक्रांत संमेलनात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच्या फोटोप्रती काढून सर्व ज्ञात सस्थांना पाठविण्यात आल्या, चार वर्षांपर्यंत सुरळीत सुरू होते. मात्र पुन्हा अशी इतर संस्थांकडून येणारी माहिती कमी होत गेली व आता काय लिहावे व प्रकाशन करावे असा प्रश्न निर्माण झाला . तरीही प्रयत्न सोडला नाही. मिळेल ते साहित्य जमा करून, आणखी दोन वर्षे त्याचे प्रकाशन कसेबसे करण्यात आले.

दरम्यानच्या काळात महासंघाच्या झालेल्या एका सभेत अशा प्रकारच्या प्रतिसादाबद्दल नाराजी व पुढील प्रकाशनाबद्दल असमर्थता प्रकट करणे भाग पडले. त्या सभेत नाशिक संघाने प्रकाशनाची जबाबदारी घेतली व सुबक चार रंगातील ’संपर्क’ प्रकाशित केला, पण तेही कार्य अपुरेच राहिले.

दरम्यान डोंबिवली संघाने पुन्हा नव्या दमाने, वार्षिकाचे त्रैमासिक सुरू करण्याबाबत पुढाकार घेतला व या संघाचे एक जेष्ठ सदस्य श्री. प्रभाकर वा कोनकर यांनी संपादकत्व स्वीकारून एकहाती जाहिराती मिळविणे, साहित्य जमा करणे, वर्गणीदार मिळवणे अशा सर्वच बाबतीत हिरीरीने काम केले. हे सर्व करीत असताना इतर संघाकडून आवश्यक ती माहिती न मिळणे व अन्य अडचणींचा सामना करीत हे त्रैमासिक अव्याहत पणे गेली सात वर्षे चालविले. त्रैमासिक सुरू झाल्यावर वैयक्तिक वर्गणीदार सुरू झाले.

गेली दोन वर्षे या त्रैमासिकाची जबाबदारी पुणे संघाने घेतली असून आता हे त्रैमासिक, पुण्याहून प्रकाशित होत आहे. चौरंगी छपाई, अधिक जाहिराती, त्रैमासिकाची नोंदणी. नवनवीन विषय असा हा परिपूर्ण अंक आता आपल्या सेवेत सादर करीत करीत आहेत पुण्याचे श्री. हेमकिरण बाक्रे, श्री. गणेश गुर्जर आणि त्यांचे सहकारी.

*With*
*Best Compliments*
*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,
Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**


E-mail : swapnilsakhalkar@gmail.com
Shrikant Sakhalkar 9850130920



# माझी काश्मीर यात्रा व तेथील अविस्मरणीय आठवणी

**किशोर ठेकेदार**

**दोन्हीही बाजूंना उंच उंच पहाड तथा दऱ्या-खोऱ्यांतून, खिंडीतून जातांना अंग शहारले, एकांत खायला उठतो. आम्ही Maratha Light Infantry Regiment च्या सहाय्याने, वाटचाल करीत होतो. आमच्या मनात शिवाजी महाराजांचे रूप सतत होते. Area Accounts Office मध्ये सर्वच स्टाफ पाकिस्तान-धार्जिणा होता/ असावा. त्यामुळे बॉम्ब स्फोट केव्हां होणार, कोण करणार याची त्यांना बित्तम्-बातमी आगाऊ कळत असे. त्यामुळे ते नमाजासाठी ३-४ तास बाहेर पडत असत. Transit-camp श्रीनगरमध्ये ५-६ सैनिक व एक captain होते. एकदा रात्री २ वाजता आमच्यावर एक हरपव-Granade फेकला गेला. परंतु माती वाळूच्या पोत्यांमुळे तो फुटला नाही. एकदम गोळीबार सुरू झाला. आम्ही मिळेल तेथे आसरा घेऊन लपून राहिलो. मी helmet d blanket घेऊन गटारांत पडून राहिलो. सुदैवाने माझे प्राण वाचले. आमच्या compound मध्ये तीन अतिरेक्यांचे रक्ताने माखलेले व काळे ठिक्कर पडलेले, मुदडे पाहिले. नंतर कळले की, ते फिदाइन Military Treasure Chest मधील रोख रक्कम पळविण्यासाठी आले होते. जंगलातील अदृश्य शक्तिची जाणीव झाली. मी देवाचे आभार मानले.**



काश्मीर म्हणजे नंदनवन तेथील निसर्ग सौंदर्य अवर्णनीय आहे. सर्वत्र शुभ्र उंचच उंच हिमालयाची शिखरे दिसत होती. एका गाण्याची ओळ नकळत आठवते की,

"अब तुम्हारे हवाले वतन साथीयो
जिंदा रहने की ऋत रोज आती है,
जान देने की ऋत कभी आती नही |"

लहानपणी सावरकरांचे समग्र वाङ्मय तथा शिवाजी महाराजांचे चरित्र वाचल्यामुळे मायभूमीच्या सरहद्दीवर जाण्याचे एक स्वप्न उराशी बाळगले होते. अचानक ऑक्टोबर १९९८ च्या दिवाळीच्या सुमारास माझी बदली एरिया अकाउन्टस् ऑफिस, श्रीनगर येथे झाली. पुणे-दिल्ली, दिल्ली-जम्मू, अन जम्मू-श्रीनगर असा दीर्घ प्रवास त्यात १५ तासांचा प्रवास डोंगरघाटांचा, असा करून कामावर रूजू झालो.

एकदा मी आर्मीच्या convoy च्या ऑलिव्ह ग्रीन रंगाच्या बसेस मधून प्रवास करीत होतो. पुढे मागे बुलेट-प्रुफ ट्रंक्स् , त्यात २५-३० हत्यारी सैनिक त्यांच्याजवळ self-louding Rifles, रॉकेट लॉंचर, हात बॉम्ब, heavy Machine-Gun, Bullet-proof jackets, helmets, क्रिकेट कॉमेन्ट्री प्रमाणे सूचना हेड फोन वरून सतत मिळत असतात. असा प्रवास व्यवस्थित चालू होता. संध्याकाळी साधारण चार वाजता सूर्यास्ताला अचानक कानठळ्या बसमध्ये ऐकू आल्या. अतिरेक्यांनी जमिनीखाली पुरून ठेवला होता. पुढची ट्रक उंच उडाली. आम्हाला सांगण्यात आले की, आलबेल आहे, प्रवास चालू ठेवा. अशा प्रकारे मृत्युच्या जबड्यातील दात मोजून आमचा प्रवास चालूच राहिला. आपले भारतीय जवान पूर्णपणे सावध झाले. क्षणांत light machine Gun, छोट्या तोफा, हॅंड ग्रेनेड सह अतिरेक्यांच्या काफिल्यावर चालून गेले व त्यांचा बिमोड केला. मोठा हल्ला परतवून लावला. चौकशी अंती असे समजले की, काही पाकिस्तानी सैनिक, भारतीय-सैनिकांचा युनिफॉर्म घालून, रस्त्यावर मुड्याप्रमाणे पडून राहिले, ते गाड्यांच्या समोरच. त्यांनी Remote control ने time-bomb ट्रकवर फेकले. ज्या आपल्याच सैनिकांनी O.K. Report दिला होता. त्यांना officer-incharge ने फैलावर घेतले व विचारले की ते तथाकथित मुडदे जिवंत आहेत की मृत याची खातरजमां कां केली नाही? अशा बेभरवशाच्या लोकांना तत्काळ गोळ्या घालून ठार का नाही मारले? अतिरेक्यांनी फार मोठा धाडसी हल्ल्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो साफ फसला.

दोन्हीही बाजूंना उंच उंच पहाड तथा दऱ्या-खोऱ्यांतून, खिंडीतून जातांना अंग शहारले, एकांत खायला उठतो. आम्ही Maratha Light Infantry Regiment च्या सहाय्याने, वाटचाल करीत होतो. आमच्या मनात शिवाजी महाराजांचे रूप सतत होते. Area Accounts Office मध्ये सर्वच स्टाफ पाकिस्तान-धार्जिणा होता/ असावा. त्यामुळे बॉम्ब स्फोट केव्हां होणार, कोण करणार याची त्यांना बित्तम्-बातमी आगाऊ कळत असे. त्यामुळे ते नमाजासाठी ३-४ तास बाहेर पडत असत.

Transit-camp श्रीनगरमध्ये ५-६ सैनिक व एक captain होते. एकदा रात्री २ वाजता आमच्यावर एक hand-Granade फेकला गेला. परंतु माती, वाळूच्या पोत्यांमुळे तो फुटला नाही. एकदम गोळीबार सुरू झाला. आम्ही मिळेल तेथे आसरा घेऊन लपून राहिलो. मी helmet व blanket घेऊन गटारांत पडून राहिलो. सुदैवाने माझे प्राण वाचले. आमच्या compound मध्ये तीन अतिरेक्यांचे रक्ताने माखलेले व काळे ठिक्कर पडलेले, मुदडे पाहिले. नंतर कळले की, ते फिदाइन Military Treasure Chest मधील रोख रक्कम पळविण्यासाठी आले होते.

जंगलातील अदृश्य शक्तिची जाणीव झाली. मी देवाचे आभार मानले.

बॉर्डर रोड येथील ऑफिसेस मध्ये तारांचे विजप्रवाह सोडलेले कंपाऊंड होते. व सर्व कपड्यांची तपासणी एवढेच नव्हे; तर हातामधील पिशवी, बॅग, पर्स, पायातील बूट, मोजे देखील अंग झडतीमध्ये तपासली जायची व दररोज पासवर्ड उच्चारल्यावर खात्री पटल्यावर गेट उघडले जायचे, गेटवर बंदूकधारी २ ते ४ जवान पहाऱ्यांवर २४ तास असत. हात वर करून मोठ्याने ओरडून सांगायचे की मी सामान्य माणूस म्हणजे रयत किंवा दोस्त असा उच्चार करून, पहारेकऱ्यांना सांगायचे. रूक जाओ, आगे मत बढो, Halt, सावधान ताबडतोब स्तब्ध उभे राहून हॅंडस अप पोझिशनमध्ये शांत उभे राहयचे, कपड्यांची, बॅगांची तपासणी केल्यानंतर वीजप्रवाह बंद करून, आत घ्यायचे व तेथील Army Dog Unit मधील मोठी कुत्री आपल्या अंगाचा/कपड्यांचा वास घेतल्यानंतर त्यांची खात्री होई की, हा पाहुणा भारतीय नागरिक आहे. पाकिस्तानी अतिरेकी आपल्या सैनिकांचे युनिफॉर्म घालून आले की, कुत्री त्यांच्या हाताचा किंवा पायाचा लचका घेत असत, हे चित्र पाहिल्यावर आपल्या सैनिक अधिकाऱ्यांचे कौतुक वाटते व अभिमानाने मान ताठ व्हायची.

सरहद्दीवरील ऑफिसमध्ये Transist Camp विस्तीर्ण पटांगणामध्ये असतात. जणू काही एखादे परेड ग्राऊंड किंवा डोंगरावरील पठारावर उभा राहून Duty Officer Briefing point वर उभा राहून शिट्टी वाजली की, सर्व वातावरणात भयानक शांतता पसरायची तेव्हा, Movement Controlling officer २ मिनिटांत सांगायचे की, आता आपण ८ ते १० हजार फुटांवर उभे आहोत, जर कोणाला श्वसनाचा त्रास होत असेल; तर हात वर करा. गुडघे दुखी, छातीदुखी असेल तर वरती येण्यापूर्वी त्यांनी ऑक्सिजन (Oxygen) देऊन ताजेतवाने व्हायचे. ड्रायफ्रुटस्, फळे देऊन चढण्यासाठी मनोधैर्य निर्माण करायचे. supply point platoon ची जबाबदारी रसद पुरवठा करण्याची आहे. १० ते १२ हजार फुटांवर बर्फाच्छादित डोंगर कड्यावरती पायी पायी जाऊन, नाहीतर Artillery Air Unit च्या सहाय्याने दारूगोळा, हत्यारे, आवश्यक सामग्री वरती पोहोचविण्याची व पायदळ तुकडीवर छत्रीप्रमाणे संरक्षण द्यायची जमल्यास मोठा हल्ला झाल्याबरोबर शत्रूवर गोळीबार, प्रसंगी बॉम्ब हल्ला करून, त्यांना पळवून लावायचे अशी दुहेरी कामगिरी त्यांच्यावर सोपविलेली असते.

एकदा खेचरांमध्ये Time झेल व Timer लावून खेचरातर्फे उंचावर युध्दसामग्री, पाणी व अन्न पुरवठा पाठवले. शत्रू post वर दबा धरून आम्ही वर येण्याची संधी पहात होता. पाकिस्तानी सैनिकांनी खेचरांसकट सामग्री पकडली व आपल्या जवानांनी रिमोट कांट्रोलवरून बॉम्बचा धमाका केला. एकाच वेळी अनेक अतिरेकी मारले गेले व ठाणे काबीज केले.

एकदा आमच्या मागावर पाकिस्तानी सैनिकांच्या तुकड्या पाठलाग करीत होत्या. तेथील मेंढपाळा कडून आम्ही १५ ते २० मेंढ्या मागून घेतल्या व त्याला भरपूर पैसे चारून त्या मेंढ्यांना भलतीकडेच पिटाळले. त्यांच्या गळ्यांमध्ये टॉर्च बांधले होते. ज्यामुळे त्यांना (पाकिस्तानी) गनिमांना वाटले की, भारतीय सैनिक डोंगरमाथ्या वर चढत आहेत. अशा रितीने पाठलाग करित ते आमचे मागे मागे आले, मग यु टर्न करीत करीत शत्रूंची घेराबंदी करून तूफानी हल्ला केला आणि त्यांना यमसदनास पाठवले.

३१ डिसेंबर १९९९ ची रात्र होती. रात्रीचे ११ वाजले होते. काही अतिरेकी भारतीय युनिफॉर्म घालून आमच्या कॅंपमध्ये घुसले पिस्तूलावर सायलेंन्सर बसवून, एक एक सैनिकांना ठार करीत पुढे सरकत आले. साधारणपणे १० किंवा १२ सैनिकांना गोळ्या घालून ठार मारले होते व समोरील बिल्डींगमध्ये घुसले होते तेथे लाखो रूपये असलेली तिजोरी होती व दारूगोळा, तोफा, रायफल्स, बॉम्ब असलेल्या मॅगझीनच्या बॉक्सेस (Boxes) होत्या. माझ्या बरोबर चढ्ख चा एक जवान होता. मला म्हणाला, मी त्यांचा बंदोबस्त करतो व ८० I.I विमान विरोधी तोफांमधून धडाधड गोळे बॉम्बचा मारा केला. त्या बिलडिंगमधून ५/६ अतिरेकी बाहेर आले व त्यांना आपल्या बहादूर कमांडोंनी ठार केले. अशा रितीने ३१ डिसेंबर १९९९ ची रात्र पार पडली.

दररोज बॉम्ब गोळ्यांचे आवाज काळजात धस्स होई. जेवण नाही, आंघोळ नाही जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे जवानांच्यामुळेच आपण पंख्याची हवा खात मजेत रहात आहोत. आपण त्यांचे ऋणीच आहोत याची सतत जाणीव ठेवली पाहिजे.

## सूचना –

१) कृपया आपल्या वर्गणीचे नुतनीकरण योग्यवेळी करा.

२) **कृपया वर्गणी मनिऑर्डरने पाठवू नका.**

३) कृपया आपल्या अंकासंबंधी चौकशी १० तारखेनंतर आपल्या संघ कार्यालयात करा.

४) अंक सर्वांना वेळेवर पाठवले जातात. पण जर आपल्याला अंका १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचे कार्यालयांत सोमवार ते शनिवार सायंकाळी ५ ते ७ या वेळांत संपर्क साधावा. दुरध्वनी क्र. ०२० – २४४३२४४३

५) काही वर्गणीदार बॅंकेत पैसे भरतात पण आमच्या कार्यालयांस कळवायचे राहून जाते व त्यामुळे आम्हाला ते पैसे कुणी भरले हे कळत नाही व त्यामुळे आपल्याला अंक मिळत नाहीत, तरी वर्गणी बॅंकेत भरल्याचे त्वरीत पुणे कार्यालयास कळवावे.